नगरसचिव कार्यालय
पुणे महानगरपालिका
दिनांक :-२०/२/२०१९

**-: परिपत्र :-**

**पुणे महानगरपालिका मुख्य सभेच्या कामकाजाच्या नियमापैकी नियम क्र. १ (के) अन्वये बुधवार दिनांक २० फेब्रुवारी २०१९ रोजी दुपारी ३:०० (तीन) वाजता भरलेल्या माहे फेब्रुवारी २०१९ या मासिक सभेच्या कार्यपत्रिकेवर तातडीचे म्हणून दाखल करुन घेण्यात आलेले विषय.**

**विषय क्र.१/११५९**

संदर्भ - १) मा.सौ.संजिला पठारे यांचे दि. २८/१/२०१९ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२३८७,दि.५/२/२०१९

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

प्रभाग क्र. ४ क मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रु.३० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, १६.उद्याने, प्राणीसंग्रहालये, पान क्र. ११२, अ.क्र. ५, शहरातील विविध उद्यानांमध्ये विकास कामे करणे, (यादी एसयु १), | | |
| १) पान क्र.२७३, अ.क्र.२४, प्रभाग क्र.४ क स.नं.३८ येथील सातववस्ती टस्कन सोसायटी येथील मनपाच्या ताब्यातील जागेवर गार्डन करणे. | १५ लाख | --- |
| २) पान क्र.२७३, अ.क्र.२५, प्रभाग क्र.४ क स.नं.३८ येथील मनपाच्या ताब्यातील जागेवर गार्डन विकसित करणे. | १५ लाख | --- |
| **नविन सुचविलेली कामे-** | | |
| १) प्रभाग क्र.४ क मधील बोराटे वस्ती येथे ड्रेनेज लाईन टाकणे. | --- | १० लाख |
| २) प्रभाग क्र.४ क मधील खुळेवाडी येथे ड्रेनेज लाईन टाकणे. | --- | १० लाख |
| ३) प्रभाग क्र.४ क मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे. | --- | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र.२/११६०**

संदर्भ - १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/घनकचरा/१२११ दि. २८/१/२०१९ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२४०७,दि.५/२/२०१९

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून -

प्रभाग क्र. १४ मध्ये घोले रोड रॅम्प येथील जागेमध्ये प्लास्टिक पासून इंधन तयार करावयाचे प्रकल्प सी.एस.आर.व अन्य फंडच्या माध्यमातून बी-२ पध्दतीने उभारणे कामी टेंडर्स मागविली असता मे.प्यू रो फ्युअल्स प्रा.ली. यांचे एकच टेंडर आले असल्याने त्यांचेकडून प्रती वर्ष मनपास र.रुपये १,६०,०००/- म्हणजेच पंधरा वर्षात र.रुपये २४,००,०००/- पर्यंत रक्कम मिळवून काम करुन घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.३/११६१**

संदर्भ - १) मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मोवावि/८५४ दि.१७/१२/२०१८ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२४१०,दि.५/२/२०१९

----

मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून -

पुणे महानगरपालिकेच्या मोटार वाहन विभागाकडील ११ - यांत्रिकी, क- यांत्रिकी स्थापत्य अधिकारी यांचे कार्यालय या अंदाजपत्रकीय शिर्षकावरील पेट्रोल, डिझेल, ऑईल व सिएनजी साठी खर्च व सुटे भाग खर्च तसेच ११ - यांत्रिकी, ग- मोटार विभाग या अंदाजपत्रकीय शिर्षकावरील ठेकेदारी पध्दतीने घेण्यात येणाऱ्या मोटार सारथी/तांत्रिक सेवकांचे वेतन या कामी खालीलप्रमाणे वर्गीकरणाद्वारे र.रुपये ७३० लाख आर्थिक तरतूद उपलब्ध करून देणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, मोटार वाहन विभाग | | |
| १) ७- यंत्र सामुग्री व घसरा निधीतुन विकत घ्यावयाची सामुग्री FE 17 A 208 - कचरा व्यवस्थापन अंतर्गत घंटा ट्रक, घंटा रिक्षा इ.घेणे | २१९ लाख | ---- |
| २) ७- यंत्र सामुग्री व घसरा निधीतुन विकत घ्यावयाची सामुग्री, FE17A218 - पुणे महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट होणाऱ्या गावामध्ये कचरा वाहतूक करणारी वाहने कॉम्पॅक्टर, डंपर प्लेसर, बीआरसी, घंटागाडया, मैलागाडया, ट्रॅक्टर, कंटेनर इ. करीता आवश्यकतेप्रमाणे वाहने खरेदी करणे | ५११ लाख | ---- |
| नविन सुचविलेली कामे- | | |
| मोटार वाहन विभाग | | |
| १)२ - पेट्रोल, डिझेल, ऑईल व सिएनजी साठी खर्च RE21A103 | ---- | १४० लाख |
| २) २ अ - सुटे भाग खर्च RE21A103A | ---- | ९० लाख |
| ३)ठेकेदारी पध्दतीने घेण्यात येणाऱ्या मोटार सारथी/ तांत्रिक सेवकांचे वेतन RE21C104B | ---- | ५०० लाख |

**विषय क्र.४/११६२**

संदर्भ - १) मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/माव्य/८६४ दि.१९/१२/२०१८ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२४११,दि.५/२/२०१९

----

मा.अति.महा.आयुक्त(इ) यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून -

पुणे महानगरपालिकेच्या १० सांस्कृतिक केंद्रातील स्वच्छतेच्या कामाची निकड विचारात घेता माहे ऑक्टोंबर २०१८ ते फेब्रुवारी २०१९ या कालावधीतील स्वच्छता कामांची बिले आदा करणेसाठी खालीलप्रमाणे वर्गीकरणाद्वारे र.रुपये ६२,६५,०००/- उपलब्ध करुन देणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-२०१९ चे अंदाजपत्रक, सांस्कृतिक केंद्र विभाग, बालगंधर्व रंगमंदिर पुनर्निमाण करणे, CE 28A160/SJ 16-124 | ६२,६५,०००/- | ---- |
| नविन सुचविलेले काम- | | |
| सांस्कृतिक केंद्र विभाग, RE 28A 105, पुणे मनपाची १० सांस्कृतिक केंद्रातील स्वच्छता विषयक मक्त्यांची बिले आदा करणेकरीता तरतूद कमी पडत असल्याने | ---- | ६२,६५,०००/- |

**विषय क्र.५/११६३**

संदर्भ - १) मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/९७६ दि.३/१/२०१९ चे पत्र
२) मा.स्थायी समिती ठराव क्र. २१६१ दि. १६/१/२०१९
३) मा.सौ.संगिता ठोसर व मा.सौ.लक्ष्मी दुधाने यांचे दि. २९/१/२०१९ चे फेरविचाराचे पत्र.
४) मा.स्थायी समिती ठराव क्र. २१७९ दि. ३०/१/२०१९
५) मा.स्थायी समिती ठराव क्र.२४१९,दि.५/२/२०१९

----

मा.स्थायी समिती ठराव क्र. २१६१ दि. १६/१/२०१९ चा फेरविचार करण्यात आला.

मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

पुणे महानगरपालिकेमध्ये नव्याने समाविष्ट झालेल्या उरळी देवाची येथील कात्रज बायपास ते वैष्णवी सिटी (आर्दशनगर) रस्त्याचे विकसन करणेसाठी रक्कम रूपये १०० लक्षाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, घनकचरा व्यवस्थापन विभाग, RE19A-155 कचरा हस्तांतरण केंदावरुन बी आर.टी.द्वारे कचरा वाहतुक करणे | १०० लक्ष | ---- |
| नविन सुचविलेले काम- | | |
| पथ विभाग, उरळी देवाची येथील कात्रज बायपास ते वैष्णवी सिटी (आर्दशनगर) रस्त्याचे विकसन करणे | ---- | १०० लक्ष |

**विषय क्र.६/११६४**

संदर्भ – १) शासन निर्णय क्र.एनयुआर /२०१३/प्र.क्र.३३८/निवि–३३ दि.१८/०२/२०१४

२) महापालिका सभा ठराव क्र.३४ दि.२१/०५/२०१८

३) PMPML/मुलेविअ/६८४४ दि.१५/०१/२०१९.

४) मुद्रण /७४४ दिनांक–१४/०१/२०१९

५) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुले/१२१५ दि.२८/१/२०१९ चे पत्र.

६) मा.स्थायी समिती ठराव क्र.२४२१,दि.५/२/२०१९

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

सन २०१७–१८ या आर्थिक वर्षातील पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या ताळेबंदाचे लेखापरिक्षण मा.मुख्य लेखापरिक्षक यांचेकडून प्रमाणित झाल्याने संचलन तुटीपोटी देय ठरणारी उर्वरित रक्कम PMPML संस्थेस आदा करणेसाठी खालील बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) सन २०१७–१८ च्या संचलन तुटीपोटी कळविणेत आलेल्या रकमेपोटी पुणे महानगरपालिकेडून देय ठरणारी उर्वरीत रक्कम रु.२२,१४,८७,०४२/– PMPML संस्थेस आदा करावाच्या रक्कमेतुन मुद्राणालयाकडे PMPML च्या छपाई बिलपोटी जमा करावायची रक्कम रु १८,७९,४९८/– (मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमुद केलेल्या संदर्भ क्र.–४) समयोजित करुन उर्वरित रक्कम रु.२१,९६,०७,५४४/– पी.एम.पी.एम.एल संस्थेस अदा करणेस.

२)वरील रक्कम आदा करणेसाठी सन २०१८–१९ ची तरतुद अपुरी पडत असल्याने PMPML संस्थेस पुणे महानगरपालिकेडून देय ठरणा–या इतर तरतुदीच्या रक्कमेधुन वर्गीकरण करणेस.

**विषय क्र.७/११६५**

संदर्भ – १) मा. श्री.दिपक अशोक पोटे, अध्यक्ष, वारजे कर्वेनगर क्षेत्रिय कार्यालय प्रभाग समिती, पुणे महानगरपालिका यांचे दि. ५/१०/२०१७ रोजीचे पत्र

२) मा. श्री. सुशिल शिवराम मेंगडे, अध्यक्ष, शहर सुधारणा समिती, पुणे महानगरपालिका यांचे दि. ५/१०/२०१७ रोजीचे पत्र.

३) श्री संकल्प सामाजिक प्रतिष्ठाण यांचे दि. १२/१०/२०१७ चे मागणी पत्र.(स.वि.वि. आ. क्र . २२३४, दि. १२/१०/२०१७)

४) मालमत्ता व व्यवस्थापन विभागाकडील जा. क्र.माव्य/१५६२, दि.१४/१२/२०१७ यांचा अभिप्राय.

५) मा. महापालिका आयुक्त यांनी आ. क्र. ३६२४, दि. १६/१२/२०१७ रोजीच्या निवेदनावर दिलेली मान्यता.

६) दै . वर्तमानपत्र दै. इंडियन एक्सप्रेस व बंधुप्रेम मधील दि. ७/१/२०१९ रोजीची जाहिरात(जाहिरात क्र.१/७७९, दि. ५/१/२०१९)

७) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/सविवि/१२७८ दि.२/२/२०१९ चे पत्र.

८) मा.स्थायी समिती ठराव क्र.२४६२,दि.५/२/२०१९

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

पुणे पेठ एरंडवणा स.नं. ३९/२/२, सि. स. नं.९४३ येथील २ गाळ्यांमध्ये अशासकिय/ सामाजिक / स्वयंसेवी संस्था व पुणे मनपा (समाज विकास विभाग) यांच्या संयुक्त सहकार्याने प्रकल्प राबविणेसाठी खालील बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) पुणे पेठ एरंडवणा स.नं. ३९/२/२, सि. स. नं.९४३ येथील २ गाळ्यांमध्ये श्री संकल्प सामाजिक प्रतिष्ठान या संस्थेच्या सहकार्याने संयुक्त प्रकल्प अंतर्गत महिला सक्षमीकरण,ज्येष्ठ नागरीक, दिव्यांग व्यक्ती व महिलांकरीता कायदेविषयक सल्ला व योजनांची माहिती देणे, स्वयंरोजगारासाठी प्रवृत्त करणे, किशोरवयीन मुलींसाठी प्रशिक्षण इ. उपक्रम राबविणेस.

२) समाज विकास विभाग, पुणे महानगरपालिका व श्री संकल्प सामाजिक प्रतिष्ठान, एरंडवणे–कर्वेनगर, पुणे यांचे संयुक्त विद्यमानाने पाच वर्षे कालावधी करीता करारनामा करून सदर प्रकल्प राबविणेस.

३)सदर संयुक्त प्रकल्प राबविणेचे सर्व अधिकार मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना अथवा मा. महापालिका आयुक्त यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास देणेस.

४) सदर संस्थेबरोबर करारनामा करणेचे अधिकार मा.उप आयुक्त समाज विकास विभाग, पुणे महानगरपलिका यांना देणेस.

**विषय क्र.८/११६६**

संदर्भ – १) टेंडर क्र.४४४/२०१६, वर्कऑर्डर जा.क्र. २८२ दि.२६/९/२०१६

२) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/पापु/१३०० दि.५/२/२०१९ चे पत्र.

३) मा.स्थायी समिती ठराव क्र.२४६३,दि.५/२/२०१९

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

पुणे पर्वती फायनल प्लॉट क्र.५१३ क येथील पुणे महानगरपालिकेमार्फत बांधण्यात आलेला जलतरण तलावाचे संपूर्ण बांधकाम मालमत्ता निर्लेखित (write-off) करुन पाडण्यास व त्याठिकाणी समान पाणीपुरवठा योजनेंतर्गत २७ (१७+१०) एम.एल.क्षमतेच्या टाक्या बांधणेसाठी खालील बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) पुणे पर्वती फायनल प्लॉट क्र.५१३ क येथील पुणे महानगरपालिकेमार्फत बांधण्यात आलेला जलतरण तलावाचे संपूर्ण बांधकाम मालमत्ता निर्लेखित (write-off) करणेस,

२) सदर जलतरण तलावाचे संपूर्ण बांधकाम पाडण्यास,

३) व त्या जागेवर समान पाणीपुरवठा योजनेंतर्गत २७ (१७+१०) एम.एल.क्षमतेच्या टाक्या बांधणेस.

**विषय क्र.९/११६७**

संदर्भ – १) PMPML/पासवि /४१९१,दि.१६/८/२०१८

२) मा.स्थायी समिती ठ.क्र.१४४२,दि.२३/१०/२०१८

३) सामान्य प्रशासन विभाग जा.क्र.साप्र/आस्थाप्र-४/७५५४,दि.१६/११/२०१८

४) माहिती व जनसंपर्क कार्यालय जा.क्र.मावजसंका/१३८१,दि.३०/१०/२०१८

५) शिक्षणाधिकारी माध्यमिक व तांत्रिक शिक्षण विभाग जा.क्र.इओ/उपअधि/८७४,दि.२९/९/२०१८

६) समाज विकास विभाग जा.क्र.सविवि/२८४९,दि.२६/११/२०१८

७) समाज विकास विभाग जा.क्र.सविवि/३४१८,दि.१/१/२०१९

८) समाज विकास विभाग जा.क्र.सविवि/१६४९,दि.२१/८/२०१८

९) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मुले/१३०६,दि.५/२/२०१९ चे पत्र.

१०) मा.स्थायी समिती ठराव क्र.२४६४,दि.५/२/२०१९

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

PMPML संस्थेस सन २०१७-२०१८ या वर्षात वितरीत केलेल्या मोफत/सवलतीचे बसपासपोटी र.रू.२५,६१,२६,५६२/- देय ठरत आहे. त्यापैकी यापूर्वीच उचल स्वरूपात आदा करण्यात आलेले र.रू.२१ कोटी समायोजित करून उर्वरित र.रू.४,६१,२६,५६२/- PMPML संस्थेस आदा करणेस मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.१०/११६८**

संदर्भ – १) मा.ॲड्.भैय्यासाहेब जाधव यांचे दि. ४/२/२०१९ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२४६५,दि.५/२/२०१९

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

प्रभाग क्र. ४ अ मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रु.२५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १०४, अ.क्र. १२, शहरातील रस्ते कॉंक्रीटने विकसित करणे, (यादी क्र. एसए १५), पान क्र.१९३, अ.क्र.८१, प्रभाग क्र. ४ अ मधील विविध ठिकाणी कॉंक्रीटीकरण कामे करणे, विद्युत विषयक कामे करणे | २५ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम- प्रभाग क्र. ४ अ मध्ये विविध ठिकाणी विविध विकास कामे करणे | --- | २५ लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र.११/११६९**

संदर्भ – १) मा.सौ.मंजुषा नागपुरे व मा.मारुती तुपे यांचे दि. ५/२/२०१९ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२४६६,दि.५/२/२०१९

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

स.नं.५८५ लोढा कॉर्नर शेजारील ओपन स्पेस बिबवेवाडी येथे बांधण्यात आलेल्या योगा हॉल मे/श्री.तिरुपती प्रतिष्ठान, १३ महात्मा फुले पेठ, कस्तुरी चौक, पुणे – ४११००२ यांना ०५ वर्ष मुदतीकरिता व्यवस्थापन व देखभालासाठी मान्यता देण्यात यावी असा ठराव मा.प्रभाग समिती,महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय,बिबवेवाडी यांचा दि.२५/०६/२०१८ चा.ठ.क्र.१ अन्वये मान्य करण्यात आलेला आहे. यामुळे सदर भागातील नागरिकांना सदर हॉलचा शारिरिक व मानसिक स्वास्थ्याकरीता उपयोग होणार आहे.

तरी सदर भागांतील नागरिकांच्या मागणीनुसार व पुणे महानगरपालिका जागा/मिळकत वाटप नियमवाली२००८ मधील तरतुदीनुसार मे/श्री.तिरुपती प्रतिष्ठान, १३ महात्मा फुले पेठ, कस्तुरी चौक, पुणे – ४११००२ यांस ५ वर्षांकरिता वापरण्यास देणेसाठी मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.१२/११७०**

संदर्भ – १) मा.सौ.मंजुषा नागपुरे व मा.मारुती तुपे यांचे दि. ५/२/२०१९ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२४६७,दि.५/२/२०१९

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

स.नं.५८५ लोढा कॉर्नर शेजारील ओपन स्पेस बिबवेवाडी येथे बांधण्यात आलेल्या जीम्नॅशियम हॉल व तळमजला येथील ऑफिस मे/श्री.युवा संदेश मंडळ ,स.नं ५८५/१,संदेश सोसायटी ,सॅलीसबरी पार्क,गुलटेकडी ,पुणे –३७ यांना ०५ वर्ष मुदतीकरिता व्यवस्थापन व देखभालासाठी मान्यता देण्यात यावी असा ठराव मा.प्रभाग समिती,महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय,बिबवेवाडी यांचा दि.२५/०६/२०१८ चा.ठ.क्र.२ अन्वये मान्य करण्यात आलेला आहे. यामुळे सदर भागातील नागरिकांना सदर हॉलचा शारिरिक व मानसिक स्वास्थ्याकरीता उपयोग होणार आहे.

तरी सदर भागांतील नागरिकांच्या मागणीनुसार व पुणे महानगरपालिका जागा/मिळकत वाटप नियमवाली२००८ मधील तरतुदीनुसार मे.श्री.युवा संदेश मंडळ, स.नं. ५८५/१, संदेश सोसायटी सॅलीसबरी पार्क,गुलटेकडी,पुणे-३७ यांना ०५ वर्ष मुदतीकरिता वापरण्यास देणेसाठी मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.१३/११७१**

संदर्भ – १) मा.सौ.रुपाली धाडवे यांचे दि. ३/९/२०१८ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र. १०५० दि. ५/९/२०१८
३) मा.सौ.रुपाली धाडवे व मा.सौ.श्वेता गलांडे-खोसे यांचे दि.६/२/२०१९ चे फेरविचाराचे पत्र.
४) मा.स्थायी समिती ठराव क्र.२४७२,दि.१४/२/२०१९

----

मा.स्थायी समिती ठराव क्र. १०५० दि. ५/९/२०१८ चा फेरविचार करण्यात आला.

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

मा.स्थायी समिती ठराव क्र. १०५० दि. ५/९/२०१८ चा फेरविचार करुन सदर ठरावातील नविन सुचविलेल्या कामामधील अ.क्र. २० प्रभाग क्र. ३७ ब बालाजी मार्केट समोरील जागेत मार्केट उभारणे र.रु. १० लाख या कामाऐवजी प्रभाग क्र. ३७ ब मध्ये विविध ठिकाणी सी.सी.टि.व्ही. कॅमेरे बसविणे र.रु. १० लाख अशी दुरुस्ती करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

याबाबत यापुर्वी झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. १०५० दि. ५/९/२०१८ चा दुरुस्त करण्यात येत आहे.

**विषय क्र.१४/११७२**

संदर्भ – १) मा. सौ.मंजुश्री खर्डेकर व मा.सौ.माधुरी सहस्त्रबुध्दे यांचे दि. १४/१२/२०१८ चे पत्र
२) शहर सुधारणा समिती ठराव क्र.३८८ दि.२५/१/२०१९
३) मा.स्थायी समिती ठराव क्र.२४८९,दि.१४/२/२०१९

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

प्रभाग क्र १३ एरंडवणे-हॅपी कॉलनी मधील नेचरवॉक चॅरीटेबल ट्रस्ट ही संस्था गेले अनेक वर्षांपासून निसर्ग संवर्धनाचे,पर्यावरण रक्षणाचे काम करीत आहे.सदर संस्थेमार्फत पर्यावरण रक्षाणाचे अनेक कार्यक्रम राबविले जातात.याच प्रमाणे लहान मुले,महिला,जेष्ठ नागरीक यांच्या समावेत विविध पर्यावरण संर्वधनाचे,त्याबाबत जनजागृतीचे कार्यक्रम,चर्चासत्रे,शिबीरे विविध प्रकारचे उपक्रम राबविले जातात.तसेच मुलांमध्ये निर्सगा विषयक आवड निर्माण

होण्यासाठी त्यांना लेकचर्सचे,सहलींचे आयोजन करीत असत.यामुळे सदर संस्थेची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत असून अनेक नागरिक,मुले,जेष्ठ नागरिक या संस्थेमार्फत घेण्यात येणा-या विविध उपक्रमांमध्ये सहभागी होत आहे.परंतु कार्यालयीन जागेअभावी यामध्ये अनेक अडचणी निर्माण होत आहेत.

आमचे प्रभागातील नागरिकांच्या मागणीनुसार व मुलांसाठीच्या गरजेनुसार प्रभाग क्र १३ मधील योग केंद्र व मुलांसाठी वाचनालय याकरिता बांधण्यात आलेल्या इमारतीमधील ९८० चौ.फुट क्षेत्रफळाचे हॉल कायमस्वरुपी देणे गरजेचे आहे.

तरी सदर भागांतील नागरिकांच्या मागणीनुसार व जागा वाटप नियमावाली २००८ नुसार संयुक्त प्रकल्पातील भाग १० अनुक्रमांक १ नुसार या हॉलचे क्षेत्रफळ १५०० चौ.फु. पेक्षा कमी आहे.म्हणून पुणे मनपा व नेचरवॉक चॅरीटेबल ट्रस्ट यांस वापरण्यास देण्यास मान्यता देणेस व नियमानुसार संयुक्त प्रकल्प म्हणून करारनामा करण्यास व स्वामित्वापोटी वार्षिक १ रुपया नाममात्र भाडे भरण्यास करारनाम्यात किमान ५ वर्षांची मुदत नमुद करण्यास करारनाम्यातील अटी व शर्तीचे संस्थांनी काटेकोरपणाने पालन करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.१५/११७३**

संदर्भ – १) मा.सौ.राजश्री नवले,अध्यक्षा,महिला व बाल कल्याण समिती ,मा.सौ.रुपाली धावडे, मा.सौ.मनिषा लडकत व मा.सौ.पूजा कोद्रे यांचे दि.६/२/२०१९ चे पत्र

२) मा.महिला व बाल कल्याण समिती सभा ठराव क्र.१४४ दि.११/२/२०१९

३) मा.स्थायी समिती ठराव क्र.२५२०,दि.१४/२/२०१९

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

महानगरपालिका समाज विकास विभागामार्फत होतकरु तरुण–तरुणींना विविध प्रकारचे प्रशिक्षण देवून त्यांना स्वयंरोजगार मिळावा याकरिता प्रयत्न केले जातात. तसेच प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांना व्यवसायासाठी आवश्यक असलेले साहित्य उपलब्ध करुन दिले जाते. यासाठी मनपाच्या अंदाजपत्रकामध्ये पुरेशी तरतूद देखील आहे.

प्रधानमंत्री रोजगार अंतर्गत खादी आणि ग्रामोद्योग आयोग (केव्हीआयसी) यांच्या मार्फत राष्ट्रीय पातळीवर नोडल एजन्सी म्हणून कार्यरत असलेल्या योजनेव्दारे पुणे महानगरपालिका हद्दीतील होतकरु व व्यवसाय करु इच्छित सर्व जाती धर्मातील वय वर्षे १८ ते ५० वयोगटातील स्त्री व पुरुष, अपंग तसेच माजी सैनिक इत्यादींना खनिज आधारीत उद्योग ( कुंभार उद्योग, पाटी पेन्सील निर्मिती, सरपणापासून प्लास्टर ऑफ पॅरिस वस्तू तयार करणे ,गुलाल रांगोळी तयार करणे,रत्न कटाई,रंग,वार्निश डिस्टेंपर तयार करणे, बांगड्या तयार करणे,सोने चांदी,दगड,कृत्रिम धातुपासून दागिने तयार करणे व अन्य) तसेच वनसंपत्ती आधारित उद्योग उदा.(हात कागद उद्योग,काथ ,लाख,कागद प्लेस्ट व कागदाची इतर उत्पादने, खस ताट्या व झाडु निर्मिती, ताग्यापासून वस्तु तयार करणे ,वह्या,लिफाफा , रजी कागदाची अन्य लेखन सामुग्री तयार करणे व अन्य)तसेच कृषी आधारीत उद्योग उदा.(धान्य डाळ मसाले तयार करणे, पीठ गिरणी,लहान तांदुळ गिरणी, मधमाश्या पालन,दुग्ध उत्पादने, पशु खाद्य व कुकुट खाद्य बनवने,औषधी वनस्ती संकलन,भारतीय मिठाई तयार करणे,गुळ खांडसरी उद्योग व अन्य) तसेच रसायन आधारीत उद्योग उदा.( चर्म उद्योग,साबण ,रबरच्या वस्तु निर्मिती , बिंदी निर्मीती,मेनबत्ती,खडू तयार करणे,सुगंधी तेल,अत्तर,मेहंदी, धुन्याचा साबन,पावडर तयार करणे व अन्य) तसेच अभियांत्रिकी व अपारंपारीक उर्जा उद्योग उदा.(सुतार,लोहार काम,छत्री निर्मिती,मोटार वायंडिंग,कागदपीन,स्टोव्ह पीन निर्मिती,गांडुळ खत निर्मिती, संगीत वाद्य निर्मिती,लाकडावर कोरीव काम, इलेक्ट्रॉनिक्स व आलार्म निर्माण व अन्य) प्रशिक्षण देवून व्यवसायासाठी आवश्यक असणारे कर्ज उपलब्ध करुन देणार आहेत . कर्ज घेतलेल्या व्यक्ती नियमानुसार कर्ज फेड करीत असल्यास पीएमईजीपी ( प्रकल्प खर्चाच्या ) अंतर्गत लाभार्थींच्या अनुदानाचा दर सामान्य श्रेणी (शहरी विभाग ) पुरुष कर्जदारास १५% व महिला कर्जदारास २५% तर ग्रामीण भागातील पुरुष कर्जदारास २५% व महिला कर्जदारास ३५% तसेच शहरी किंवा ग्रामीण भागातील महिला व पुरुष (एससी/एसटी/ ओबीसी/अल्प संख्यांक/महिला, माजी सैनिक, शाररिक अपंग ) कर्जदारास ३५% राहील .

सदरचे कोर्सेस अल्प मुदतीसाठी ( १२ दिवस ) र.रु. २०००/– + सरकारी कर व ३० दिवसांचे प्रशिक्षण घेण्यासाठी र.रु.८०००/– + सरकारी कर एवढा खर्च प्रति प्रशिक्षणार्थींना येणार आहे. प्रत्येक बॅचमध्ये ५० प्रशिक्षणार्थींना शिकविले जाईल. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर योग्य ते प्रशस्तिपत्र मिळाल्यामुळे महानगरपालिका हद्दीतील स्वयंरोजगार करु इच्छिणाऱ्यांना त्याचा मोठा फायदा होवू शकेल . वरील सर्व प्रकारचे कोर्सेस प्रधानमंत्री रोजगार अंतर्गत खादी आणि ग्रामोद्योग आयोग (केव्हीआयसी) यांच्या मार्फत राष्ट्रीय पातळीवर नोडल एजन्सी म्हणून कार्यरत असलेली केंद्रीय कुंभारी प्रशिक्षण संस्था, खानापुर,जिल्हा बेळगांव,कर्नाटक व पुणे महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यासाठी प्रशासकीय मंजूरीची व आर्थिक तरतूदीची आवश्यकता आहे .

तरी प्रधानमंत्री रोजगार अंतर्गत खादी आणि ग्रामोद्योग आयोग (केव्हीआयसी) यांच्या मार्फत राष्ट्रीय

पातळीवर नोडल एजन्सी म्हणून कार्यरत असलेली केंद्रीय कुंभारी प्रशिक्षण संस्था, खानापुर,जिल्हा बेळगांव,कर्नाटक यांच्या मार्फत दिले जाणारे सर्व प्रकारची प्रशिक्षण पुणे महानगरपालिकेच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यास तसेच त्यासाठी आवश्यक असणारी तरतूद महानरपालिकेच्या अंदाजपत्रकामध्ये दरवर्षी करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.१६/११७४**

संदर्भ – १) मा.श्रीकांत जगताप व मा.महेश वाबळे यांचे दि.१२/२/२०१९ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२५२१,दि.१४/२/२०१९

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

प्रभाग क्र. ३५ ड व प्रभाग क्र. ३४ ड मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू. १ कोटीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १०४, अ.क्र. १, शहरातील रस्ते डांबरीकरण करणे, (यादी क्र. एसए-२), पान क्र. १७४, अ.क्र. ७२५, तळजाई ते सिंहगड रस्ता नव्याने रस्ता करणेसाठी बोगदा तयार करणेसाठी सल्लागार नेमणे व डी.पी.आर. करणे | १ कोटी | --- |
| नविन सुचविलेली कामे- | | |
| १)प्रभाग क्र.३५ ड मध्ये विणकर सोसायटी ते कुमार पंचशीलकडे जाणारा रस्ता कॉंक्रिटीकरण करणे. | --- | २० लाख |
| २) प्रभाग क्र.३५ ड मध्ये शंकर महाराज वसाहत संभाजीनगर रस्ता कॉंक्रिटीकरण करणे. | --- | २० लाख |
| ३) प्रभाग क्र.३५ ड मध्ये तळजाई पठार येथे रस्ते तयार करणे. | --- | १० लाख |
| ४) प्रभाग क्र.३४ ड मध्ये सईनगर व परिसरामध्ये विविध ठिकाणी विद्युत विषयक कामे करणे. | --- | २५ लाख |
| ५) प्रभाग क्र.३४ ड मध्ये विविध ठिकाणी विद्युत विषयक कामे करणे. | --- | २५ लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र.१७/११७५**

संदर्भ – १) मा.दिलिप वेडेपाटील व मा.मारुती तुपे यांचे दि.१२/२/२०१९ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२५२२,दि.१४/२/२०१९

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

लोकमत समुहातर्फे लोकमत पुणे महा-मॅरेथॉन २०१९ स्पर्धा आयोजित करणे (क्रीडा विभाग) साठी र.रू. २० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, १.मुख्य देखरेख, वसुली वगैरे ड सांख्यिकी व संगणक कार्यालय, पान क्र. ४६, अ.क्र. ३, विशेष प्रकारचे हिशोबी काम कॉम्प्युटरमार्फत करुन घेणे,ERP अंमलबजावणी, Software Development, Data Entry, सेवकांना प्रशिक्षण खर्च, GIS, Works Management System, Kisok व तदनुषंगिक कामे करणे बजेट हेड RE11N103 | २० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम- | | |
| लोकमत समुहातर्फे लोकमत पुणे महा-मॅरेथॉन २०१९ स्पर्धा आयोजित करणे (क्रीडा विभाग) | --- | २० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र.१८/११७६**

संदर्भ – १) मा.मुरलीधर मोहोळ व मा.दिलिप वेडेपाटील यांचे दि.१२/२/२०१९ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२५२३,दि.१४/२/२०१९

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

प्रभाग क्र.१२ क बाळासाहेब ठाकरे उद्यान कोथरुड येथे विद्युत विभागाकडील टॉकिंग ट्रीज कामे करणेसाठी र.रू. ३० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, १६.उद्याने, प्राणीसंग्रहालये, पान क्र. ११२, अ.क्र. ५, शहरातील विविध उद्यानांमध्ये विकास कामे करणे, (यादी एसयु १), पान क्र.२७४, अ.क्र.६६, प्रभाग क्र.१२ क मध्ये थोरात उद्यान येथे ओपन जिम करणे | ३० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम- | | |
| प्रभाग क्र.१२ क बाळासाहेब ठाकरे उद्यान कोथरुड येथे विद्युत विभागाकडील टॉकिंग ट्रीज कामे करणे | --- | ३० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र.१९/११७७**

संदर्भ - १) मा.मुरलीधर मोहोळ व मा.दिलिप वेडेपाटील यांचे दि.१२/२/२०१९ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२५२४,दि.१४/२/२०१९

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

प्रभाग क्र.१२ क मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू. २५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, १६.उद्याने, प्राणीसंग्रहालये, पान क्र. ११२, अ.क्र. ५, शहरातील विविध उद्यानांमध्ये विकास कामे करणे, (यादी एसयु १), पान क्र.२७४, अ.क्र.६४, प्रभाग क्र.१२ क मध्ये थोरात उद्यान येथे लहान मुलांसाठी खेळणी बसविणे. | २५ लाख | --- |
| नविन सुचविलेली कामे- | | |
| १)प्रभाग क्र.१२ क बाळासाहेब ठाकरे उद्यान कोथरुड येथे विद्युत विभागातर्फे टॉकिंग ट्रीज करणे | --- | २० लाख |
| २)प्रभाग क्र.१२ क बाळासाहेब ठाकरे उद्यान कोथरुड येथे विद्युत विभागामार्फत म्युझिकल फाऊंटनची कामे करणे | --- | ५ लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र.२०/११७८**

संदर्भ - १) मा.मारुती तुपे व मा.सुनिल कांबळे यांचे दि.१२/२/२०१९ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२५२५,दि.१४/२/२०१९

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

दि.३१/१२/१८ अखेर पुणे मनपा हद्दीतील गोठे स्थलांतरची मुदत संपुष्टात आली आहे. तथापि गोठे धारक स्थलांतर होवू इच्छित असल्याने व काहीचे प्रिमीयम फी भरुन घ्यावयाची असल्याने दि.३१/६/२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.२१/११७९**

संदर्भ - १) मा.मारुती तुपे व मा.सौ.मंजुषा नागपूरे यांचे दि.१२/२/२०१९ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२५२६,दि.१४/२/२०१९

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

प्रभाग क्र. ३६ ब मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू. १ कोटीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, ४.झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन निधीतून करावयाची कामे, ४ क.युवक कल्याणकारी योजना निधी (नागरवस्ती विकास योजना) पान क्र. १४२, अ.क्र. २४, स्टार्टअप प्रोत्साहन करणेसाठी विशेष योजना राबविणे | १ कोटी | --- |

नविन सुचविलेली कामे

१)प्रभाग क्र. ३६ ब मध्ये यशवंतराव चव्हाण शाळा क्रिडा संकूलाच्या वरच्या मजल्याचे उर्वरीत कामे करणे व विविध विकास कामे करणे --- २५ लाख

२) प्रभाग क्र.३६ ब मध्ये के.के.मार्केट येथील ट्रक टर्मिन्सला फेन्सिंग व वॉल कंपाऊंड बांधणे --- २५ लाख

३) प्रभाग क्र. ३६ ब मध्ये जीमचे साहित्य पुरविणे --- ३० लाख

४) प्रभाग क्र. ३६ ब मध्ये विविध ठिकाणी रस्ते विकसित करणे --- १० लाख

५) प्रभाग क्र. ३६ ब मध्ये विविध ठिकाणी रस्ते कॉंक्रीट करणे --- १० लाख

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र.२२/११८०**

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/श.अ./१२०६ दि.२४/१/२०१९ चे पत्र

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.३९९,दि.८/२/२०१९

विषय- पुणे महानगरपालिका हाय कपॅसिटी मास ट्रान्झिट रूट (एच.सी.एम.टी.आर) प्रकल्पाकरीता टी.डी.ओ. पॉलिसीबाबत.

----

मा. महापालिका आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून–

मेट्रो मार्गिकेच्या धर्तीवर एच.सी.एम.टी.आर मार्गिकेलगतच्या दोन्ही बाजूचा ५०० मी. चा परिसर एच.सी.एम.टी.आर टी.ओ.डी. क्षेत्र म्हणून निर्देशित करणेस व सदरचा प्रस्ताव मे.शासनाकडे सादर करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.२३/११८१**

संदर्भ - १) मा.सहा महाव्यवस्थापक,महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि.यांचेकडील जा.क्र.MAHAMETRO/ PMRP/LAND, /२०१८/४८१ दि.०३/१२/२०१८ चे पत्र.

२) मालमत्ता व व्यवस्थापन विभाग यांचे जा.क्र.७७५४ दि.७/१/२०१९ चे पत्र.

३) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/श.अ./१३२३ दि.७/२/२०१९ चे पत्र.

४) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.४०५,दि.८/२/२०१९

----

मा.महापालिका आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून–

पुणे पेठ कसबा सि.स.नं.६२१/१ व ६२१/२,६२२,६२३ व ६२३ अे या मिळकतीवरील व्हीएम (अस्तित्वातील व्हेजिटेबल मार्केट) आणि सि.स.नं.५६३ अे व ५६९ अे या मिळकतीवरील एमपीएस(अस्तित्वातील दादोजी कोंडदेव शाळा) चे जमिन वापर बदल करून उपरोक्त दोन्ही मिळकती संपूर्णत: निवासी वापरासाठी निर्देशीत करण्याकरिता महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१ ) अन्वये कार्यवाही सुरू करण्यास व त्या अनुषंगाने दैनिक वर्तमानपत्रात व मे.शासनाचे राजपत्रात जाहीर प्रकटन देऊन नागरिकांच्या हरकती/ सूचना मागविण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.२४/११८२**

संदर्भ - १) मा.सौ.वासंती जाधव व सौ.हर्षाली माथवड यांचे दि.१६/२/२०१८ चे पत्र

२) मा.शहर सुधारणा समितीस सादर ठराव क्र.५५९ दि.२६/२/२०१८

३) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/शहर अभियंता/१३२२ दि.७/२/२०१९ ने पाठविलेला अभिप्राय

४) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.४०६,दि.८/२/२०१९

----

मौजे कोथरूड स.नं.१२९ आयडीयल कॉलनी या मिळकतीचा लेआऊट सन १९७० रोजी मंजूर करणेत आला.त्यानुसार सदर रस्ता ३० फुट आहे. सन १९८७ चे मान्य विकास आराखडयानुसार सदर लेआऊट मधील रस्ता ९.० मी रूंद आहे. महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २६ अन्वये प्रारूप विकास आराखडयानुसार सदर ठिकाणी डी.पी. रस्ता १८.० मी रूंद दर्शविला आहे. शासनस्तरीय नियोजन समिती मार्फत सादर करणेत आलेल्या विकास आराखडा (महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३० अन्वये) नुसार सदर रस्तारूंदी रद्द करणेत आली आहे.तद्नंतर कलम ३१(१)अन्वयेच्या मान्य विकास आराखडयानुसार सदर रस्तारूंदी १८ मी.रूंदी कायम करणेत आली आहे.

सन २०१७ चे मान्य विकास आराखडयानुसार सदर ठिकाणी SMR-64 अन्वये १८.० मी रूंद डी.पी.रस्ता दर्शविणेत आला आहे. तसेच सदर भाग हा Transit Oriented Development (T.O.D) झोन अंतर्गत येत असून सदर झोनसाठी उपलब्ध होणारा एफ.एस.आय/टिडीआर इत्यादींचा वापर भविष्यात होणार असल्याने लोकसंख्या घनता व त्या

अनुषंगाने वाहनांची संख्या देखील वाढणार आहे. त्यामुळे सदर ठिकाणी रस्त्याची रूंदी वाढविणे आवश्यक आहे.

सदर आयडीयल कॉलनी येथील लेआऊटचे रस्त्यांची रूंदी वाढवल्यामुळे रस्त्याला लागून असलेल्या प्लॉटसचे बरेचसे क्षेत्र रस्तारूंदी मध्ये जाणार आहे. त्यामुळे अस्तित्वातील प्लॉटचे क्षेत्र कमी होणार आहे. त्यामुळे पुर्नविकसन होणेस अडचणी निर्माण होत आहेत. तसेच चटई क्षेत्र पुर्ण वापरता येत नाही. ही वस्तुस्थिती आहे.सदर प्लॉटसना (T.O.D)झोनसाठी तसेच उपलब्ध होणारा एफ.एस.आय पुर्ण क्षमतेने वापरता येणार नाही. आयडीयल कॉलनी मधील लोकांचा सदर रस्ता रूंदीस तीव्र विरोध आहे. अस्तित्वातील ९.० मी.चा रस्ता असल्याने यासाठी प्रत्यक्ष ट्रॉफिक व्हॉल्युम कांऊट सर्व्हे, क्रिएशन इंजिनिअर्स या संस्थेमार्फत करून घेण्यात आले, या अहवालानुसार पुढील बाबी नमुद करण्यात आले आहे.

१. ट्रॉफिक काऊंट नुसार ३.५० मी.रूंदीचे २ लेन आवश्यक आहे.
२. टिओडी झोन असल्याने रस्त्याच्या एका बाजूस २.० मी रूंदीची पार्किंगची व दुस-या बाजूस ३.० मी रूंदीचा पादचारी मार्ग (फुटपाथ) आवश्यकता आहे.
३. रस्त्यावर बसमार्ग नाहीत व बसस्टॉप नाही
४. या अंतर्गत रस्त्यावर अवजड वाहनांची ये-जा नसते.

सदर सर्व्हेक्षण अहवालानुसार ३.५० मी.रूंदीची २ लेन असा ७.० मी रूंद रस्ता, रस्त्याचे एका बाजुस २.० मी. रूंद स्ट्रीट पार्किंग व दुस-या बाजूस ३.०मी रूंद फुटपाथ असे एकूण१२.० मी रस्ता ठेवणे आवश्यक आहे. सदर रस्त्याला पर्याय म्हणून स.नं.१२८ व स.नं.१३५ येथे अनुक्रमे १८ मी. रूंद व २४मी.रूंद मुख्य डी.पी. रस्ते मयुर कॉलनी मुख्य रस्ता ते पौड रस्ता पर्यंत आहेत. त्यामुळे विषयांकीत कोथरूड स.नं.१२९ मधील दोन्ही रस्त्याचे नियोजित व रस्तारूंदी प्रमाणरेषा मध्ये १८ मी. ऐवजी १२ मी रस्तारूंदी प्रमाणरेषा कायम करणे योग्य होईल.

त्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१ ) अन्वये फेर बदलाची योग्य ती पुढील कार्यवाही करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.२५/११८३**

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/साप्र/१३५४ दि.१३.२.२०१९ चे पत्र.
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.४११,दि.१३/२/२०१९

----

मा.महापालिका आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून-

पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील अभियांत्रिकी संवर्गातील कार्यकारी अभियंता (स्थापत्य) वर्ग-१ (वेतनश्रेणी १५६००-३९१००+ग्रेड पे६६०० (शासनाप्रमाणे)+मान्य भत्ते) या पदाची रिक्त पदे तदर्थ पदोन्नतीने भरणेसाठी खातेनिहाय बढती समितीने शिफारस केलेल्या निवडयादीस तसेच शासनाकडील वेळोवेळीचे प्राप्त होणारे आदेश व आस्थापना विषय बाबींचा विचार करून खालील सेवकास तदर्थ पदोन्नतीने नेमणुक करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ (१) नुसार मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अ.क्र. | सेवा जे.क्र. | नाव | प्रत्यक्ष जातीचा गट | तदर्थ पदोन्नतीचा गट | शैक्षणिक पात्रता | उप अभियंता पदावरील नेमणूक दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ३६ | श्री शिंदे बिपीन वसंत | इमाव | खुला | बी.ई.(सि) एम.ई.(सि) | १७/०९/२०१३ |
| २ | ४१ | श्री गायकवाड अविनाश बळीराम | खुला | खुला | बी.ई.(सि) एम.ई.(सि) | १७/०९/२०१३ |
| ३ | ४२ | श्री अर्धापुरे राजेंद्र वैजनाथराव | खुला | खुला | ए.एम.आय.ई | १४/११/२०१४ |

**विषय क्र.२६/११८४**

पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातील आरोग्य अधिकारी व इतर पदांच्या शैक्षणिक अर्हतेत बदल करण्याबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ४५१(१) नुसार मुख्यसभा, पुणे महानगरपालिका यांचा उपरोक्त ठराव क्र.९१६,दि.५.१.२०१७ निलंबीत करण्यात येत आहे.याबाबत ३० दिवसांच्या आत शासनास अभिवेदन सादर करणेबाबत मा.नगरसचिव यांचे जा.क्र.७३६१, दि.१३/२/२०१९ रोजीचे पत्र.

**सुनील पारखी**
**नगरसचिव**
**पुणे महानगरपालिका.**